बन्सीलाल रामनाथ अगरवाल चॅरिटेबल ट्रस्ट संचलित
विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी
(सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न स्वायत्त संस्था)
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)
६६६, अप्पर इंदिरानगर, बिबवेवाडी, पुणे - ४११ ०३७.
Approved by A. I. C. T. E. New Delhi

Bansilal Ramnath Agarwal Charitable Trust's
Vishwakarma Institute of Technology
An Autonomous Institute Affiliated to Savitribai Phule Pune University
(Formerly University of Pune)
666, Upper Indiranagar, Bibwewadi, Pune - 411 037.
Identification No. - PU/PN/Engg./061/(1984)

नोटीस क्र. २११ | नोटीस | दि. २०/०९/२०२६

**शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २००५-२६ याकरिता महाडीबीटी पोर्टलवरून विद्यार्थी लॉगीनला दुरूस्तीकरिता पाठविण्यात आलेला अर्ज (Sent Back To Applicant) रि-अप्लाय करणेकरिता दि. ३०/०९/२०२६ पर्यंत शासनातर्फे वाढविण्यात आलेल्या मुदतीबाबत.**

**(शासन नियमानुसार सवलतीस पात्र आहेत व त्यांचा अर्ज दुरूस्तीसाठी पाठविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांसाठी फक्त)**

या नोटीसव्दारे ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज Sent Back झालले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, SC/ST/OBC/SBC/VJ/DT/NT/ SEBC/EWS/OPEN-EBC/ORPHAN या प्रवर्गातील स्कॉलरशिप/ /फ्रिशीप/ ईबीसी इत्यादीकरिता नवीन / नुतनीकरणासाठी पात्र ठरलेल्या सर्व विद्यार्थ्यांना शासनाच्या निर्णयाप्रमाणे महाविद्यालयाने प्रवेशाच्या **वेळी शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क अथवा विकास निधी** इत्यादी शुल्कामध्ये सवलत लागू करून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ करिता प्रवेश दिलेला आहे. सदर शुल्काची प्रतिपूर्ती शासनाकडून महाविद्यालयास होणे आवश्यक व जरूरी होते व आहे.

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ ते २०२५-२६ या वर्षांपैकी काही विद्यार्थ्यांचे अर्ज दुरूस्तीकरीता (Sent Back To Applicant) विद्यार्थ्यांच्या लॉगीनला पाठविण्यात आलेला होते परंतू नियमानुसार शासनाच्या सवलतीस पात्र असूनही अशा विद्यार्थ्यांनी अद्याप त्यांचे अर्ज दुरूस्त केलेले नाहीत. अशा विद्यार्थ्यांकरिता ऑनलाईन अर्ज दुरूस्ती करून रि-अप्लाय करणेबाबत दि. ३०/०९/२०२६ पर्यंतच मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी अशा विद्यार्थ्यांनी आपला अर्ज **https://mahadbt2.maharashtra.gov.in/** अथवा **https://mahadbt.maharashtra.gov.in** संकेतस्थळावरून अर्ज दुरूस्ती करून महाविद्यालयाला फॉरवर्ड करावा. वरील मुदतीनंतर अर्ज विद्यार्थ्यांनला रि-अप्लाय करता येणार नाही याची नोंद घ्यावी.

तरी शासनाच्या सवलती पात्र असलेल्या सर्व व विद्यार्थीनी दि. ३०/०९/२०२६ या शासनाने दिलेल्या मुदतीनंतर स्कॉलरशिप/फ्रिशीप अथवा ईबीसी किंवा इतर सवलतींचा लाभ घेतला आहे व सदर ऑनलाईन अर्जामध्ये योग्य ती दुरूस्ती करून महाविद्यालयास पाठविला नाही अथवा सदर अर्ज विद्यार्थी लॉगीनलाच प्रलंबित राहिला गेला तर अशा विद्यार्थ्यांना शासनाच्या सवलतीचा त्या वर्षाचा लाभ मिळणार नाही परिणामी अशा विद्यार्थ्यांकडून रक्कम वसूल करणे महाविद्यालयास भाग होईल याची नोंद घ्यावी. सबब वरील मुदतीनंतर कोणत्याही विद्यार्थी कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची संबंधित विद्यार्थ्यांनी/पालकांनी नोंद घ्यावी.

**महत्त्वाची सूचना**-वरील कालावधी दरम्यान Sent Back अर्ज झालेल्या विद्यार्थ्यांनी वरील नमूद संकेतस्थळावरील सूचना अवगत प्रक्रिया पूर्ण करावी.

B. R. A. C. TRUST ★ Vishwakarma Institute of Technology ★ विश्वकर्मा इन्स्टिट्यूट पुणे - ३७.

**संचालक**
विश्वकर्मा इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी,
पुणे-३७

प्रत: १) सर्व विभाग प्रमुखांना माहितीसाठी, २) सर्व नोटीसबोर्डकरिता, ३) सिस्टीम विभाग प्रमुख यांना माहितीकरिता व विभागाचे नोटीस बोर्डकरिता प्रकाशित करणेकामी.